पुण्य नगरी

शुक्रवार, १७ जुलै २०२६

# विवेकानंद महाविद्यालयात उद्या कार्यशाळा

**कोल्हापूर :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या वतीने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि व्यावसायिक नैतिकता' या विषयावर एकदिवसीय प्राध्यापक विकास कार्यशाळा शनिवारी (दि. १८) होणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि व्यावसायिक नैतिकतेबाबत जागरूकतेसाठी ही कार्यशाळा आहे. डॉ. श्रुती जोशी आणि डॉ. जी. जे. नवाथे, डॉ. डी. आर. तुपे, डॉ. एस. आर. पाटील, प्रा. एच. व्ही. चामे मार्गदर्शन करणार आहेत.

पुढारी शहर-जिल्हा कोल्हापूर, शुक्रवार, १७ जुलै २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये उद्या कार्यशाळा

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने शनिवारी (दि. १८) सकाळी दहा वाजता 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि व्यावसायिक नैतिकता' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या सत्रात डॉ. श्रुती जोशी 'शैक्षणिक संस्थांमधील नैतिक मूल्यांचे महत्त्व आणि शिक्षकांची जबाबदारी' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. दुसऱ्या सत्रात 'परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता' या विषयावर विवेकानंद कॉलेजच्या परीक्षा विभागातील डॉ. जी. जे. नवाथे, डॉ. डी. आर. तुपे, डॉ. एस. आर. पाटील, प्रा. एच. व्ही. चामे, तिसऱ्या सत्रात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि स्वतःची जबाबदारी विषयावर डॉ. एस. आर. कट्टीमनी मार्गदर्शन करणार आहेत.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा • कोल्हापूर शुक्रवार, दि. १७ जुलै २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये उद्या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**जनप्रवास : कोल्हापूर**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त)येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) यांच्यावतीने "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) आणि व्यावसायिक नैतिकता" या विषयावर एकदिवसीय प्राध्यापक विकास कार्यक्रमाचे आयोजन शनिवार दि. १८ जुलै रोजी सकाळी १० वा. करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महाविद्यालयातील प्राध्यापकामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि व्यावसायिक नैतिकतेबाबत जागरूकता निर्माण व्हावी या उद्देशाने करण्यात आले आहे. नवनिर्वाचित प्राध्यापकांना या कार्यशाळेचा निश्चित लाभ होणार आहे. या कार्यशाळेत तीन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

पहिल्या सत्रात डॉ. श्रुती जोशी प्र. प्राचार्या, कन्या महाविद्यालय इचलकरंजी या "शैक्षणिक संस्थांमधील नैतिक मुल्यांचे महत्व आणि शिक्षकांची जबाबदारी या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.तर दुसऱ्या सत्रात परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता या विषयावर विवेकानंद कॉलेजच्या परीक्षा विभागातील डॉ.जी.जे.नवाथे( परीक्षा नियंत्रक), डॉ. डी.आर. तुपे (उपपरीक्षा नियंत्रक), डॉ.एस.आर. पाटील तसेच प्रा.एच.व्ही.चामे हे मार्गदर्शन करणार आहेत. गुणवत्तापुर्ण शिक्षणासाठी परीक्षा प्रक्रियेत प्रामाणिकपणा, गोपनीयता सांभाळणे गरजेचे आहे. या अनुषंगाने मार्गदर्शन केले जाणार आहे.

तिसऱ्या सत्रात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि स्वतःची जबाबदारी या विषयावर डॉ.एस.आर कट्टीमनी,चेअरमन विवेकानंद कॉलेज हे मार्गदर्शन करणार आहेत. आजच्या स्वायत्त महाविद्यालयापुढील जबाबदारी, धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी, गुणवत्ता वृद्धीसाठी प्राध्यापकांचे योगदान अशा अनेक मुद्यांच्या आधारे मार्गदर्शन करणार आहेत.

आयोजन (IQAC) समितीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मिलिंद हुजरे यांच्या मार्गदर्शनाखाली केले आहे. तसेच महाविद्यालयातील सर्व गुरूदेव कार्यकर्ते उत्स्फूर्त सहभाग होणार आहेत.